# वित्तीय वर्ष 2022 मध्ये कर्ज वाढीमध्ये बँक ऑफ महाराष्ट्र सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या मध्य अव्वल

वर्ष 2021-22 मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ महाराष्ट्र ने  कर्ज आणि ठेवींच्या वाढीच्या टक्केवारीमध्ये अव्वल  कामगिरी करणारी बँक म्हणून स्थान पटकावले आहे. उपलब्ध झालेल्या माहितीनुसार  मार्च 2022 च्या अखेरीस बँक ऑफ महाराष्ट्रने सकल कर्ज व्यवहारात  26 टक्के वाढ नोंदवून 1,35,240 कोटी रुपयांची नोंद केली आहे. त्यापाठोपाठ स्टेट बँक ऑफ इंडिया आणि युनियन बँक ऑफ इंडिया यांनी अनुक्रमे 10.27 टक्के आणि 9.66 टक्के वाढ नोंदविली आहे.  तथापि आकडेवारीचा विचार करता भारतीय स्टेट बँकेचा एकूण कर्जे व्यवहार  24,06,761 कोटी रुपये म्हणजे  जवळपास 18 पटीने जास्त होता , तर बँक ऑफ महाराष्ट्रच्या तुलनेत युनियन बँक ऑफ इंडियाचे  चौथ्या तिमाहीच्या शेवटी  रु 6,99,269 कोटी इतकी कर्जे होती.

ठेवींच्या वाढीच्या संदर्भात, बँक ऑफ महाराष्ट्रने 16.26 टक्के वाढ नोंदवली आणि मार्च 2022 अखेरीस 2,02,294 कोटी रुपये जमा केले. युनियन बँक ऑफ इंडिया ठेवींमध्ये 11.99 टक्के वाढीसह (रु. 10,32,102 कोटी) दुसऱ्या स्थानावर आहे, तर  प्रकाशित आकडेवारीनुसार इंडिअन  बँकेने 10 टक्क्यांनी वाढ करून रु. 5,84,661 कोटीचा व्यवसाय  नोंदवले आहेत.

बँक ऑफ महाराष्ट्राची  वित्त वर्ष २०२२ मध्ये एकूण व्यवसाय वाढ देखील सर्वाधिक 20 टक्के म्हणजे 3,37,534 कोटी रुपये होती आणि त्यानंतर युनियन बँक ऑफ इंडियाची 11.04 टक्के वाढीसह  17,31,371 कोटी रुपये होती. RAM (किरकोळ, कृषी आणि सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना ) विभागाना कर्ज वाटप करण्याच्या बाबतीत, बँक ऑफ महाराष्ट्रने सर्वाधिक 18.65 टक्के म्हणजेच 80,669 कोटी रुपयांची  वाढ नोंदविली.

बँकेचे सकल अनार्जक कर्जे ( NPA ) मार्च 2021 मध्ये 7.23 टक्क्यांवरून जवळपास 3.94 टक्क्यांवर आले, तर निव्वळ अनार्जक कर्जे ( NPA ) मार्च 2021 मधील 2.48 टक्क्यांवरून 0.97 टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे .

मार्च पर्यंतच्या संपूर्ण वर्षासाठी, बँकेच्या निव्वळ नफ्यात वित्तीय वर्ष 2021 मधील 550 कोटी रुपयांच्या तुलनेत दुप्पट वाढ होऊन निव्वळ नफा 1,152 कोटी रुपयांवर पोहोचला. बँक ऑफ महाराष्ट्रने चालू आर्थिक वर्षात निव्वळ नफ्यात 25-30 टक्क्यांच्या वाढ करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. निव्वळ व्याज उत्पन्नात (NII) चांगली वाढ आणि खराब मालमत्तेसाठीच्या तरतुदींमध्ये घट यामुळे मदत केली जाते. वार्षिक आधारावर विचार केल्यास वित्तीय वर्ष 2021 मधील 4,897 कोटी रुपयांच्या तुलनेत निव्वळ व्याज उत्पन्नात 23.42 टक्क्यांनी वाढून वित्तीय वर्ष 2022 मध्ये 6,044 कोटी रुपयांवर पोहोचला.